दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि.३ फेब्रुवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १५९ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 3 Feburary 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 159 | Pages 4 | Rate 4 Rs

## मुंबई महापालिकेत राष्ट्रवादीची मोठी खेळी

**मुंबई–** मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने एक महत्त्वपूर्ण राजकीय पाऊल उचलले असून, महापालिकेत आपल्या तीन नगरसेवकांचा स्वतंत्र गट नोंदवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. महायुतीचा घटक पक्ष असूनही मुंबईत निर्माण झालेल्या विशेष राजकीय परिस्थितीमुळे राष्ट्रवादीने हा पवित्रा घेतला आहे. या निर्णयामुळे आता मुंबई महापालिकेत सत्तेच्या समीकरणात राष्ट्रवादीचा हा गट शिंदेंच्या शिवसेनेसोबत सक्रिय राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.या राजकीय भूमिकेमागे निवडणुकीपूर्वीचे नाट्यमय संदर्भ आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपने नवाब मलिक यांच्या नावावरून घेतलेल्या आक्षेपामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला महायुतीमध्ये स्थान मिळण्यास अडचणी आल्या होत्या. परिणामी, राष्ट्रवादीला मुंबईत स्वतंत्रपणे निवडणूक लढवावी लागली होती.

# केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी एआयला प्राधान्य:अजित पवारांचे स्वप्न पूर्ण होणार

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंनी केले बजेटचे स्वागत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प शेती आणि शेतकरी कल्याणावर केंद्रित असून, कृषी क्षेत्रासाठीची तरतूद सुमारे १.५ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय क्रांतिकारक ठरणार आहे. या अर्थसंकल्पामुळे देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढण्यासोबतच शेतकऱ्यांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल होईल, असा विश्वास राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केला आहे. विशेषतः महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी ही वाढीव तरतूद आणि कृषी क्षेत्रावरील भर अत्यंत दिलासादायक असून, यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीला मोठी गती मिळेल, अशी सकारात्मक प्रतिक्रिया त्यांनी यावेळी नोंदवली.दत्तात्रय भरणे म्हणाले, आदरणीय स्वर्गीय उपमुख्यमंत्री अर्थमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून राज्याच्या गतवर्षीच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी ५५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शेती क्षेत्रात एआय धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. तसेच राज्याच्या कृषी विभागाने 'महा-विस्तार' ॲप विकसित




केले आहे. याच दिशेने पुढचे पाऊल टाकत केंद्र सरकारने या अर्थसंकल्पात 'इहरीरीं तळीीिरी' नावाचे एआय-आधारित बहुभाषिक कृषी सहाय्यक साधन जाहीर केले आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक भाषेत योग्य वेळी हवामान, पीक नियोजन, कीड-रोग नियंत्रण आणि बाजारपेठेची माहिती मिळणार असून निर्णयप्रक्रिया अधिक सुलभ होईल.

या अर्थसंकल्पात उच्च मूल्य पिके, पीक विविधीकरण आणि एआय (AI) सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर दिलेला भर कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारा आहे. कापसाचे उत्पादन आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी विशेष योजना आखण्यात आल्या असून, नारळ, चंदन व काजू यांसारख्या नगदी पिकांच्या माध्यमातून फलोत्पादनाला मोठी चालना मिळणार आहे. विशेषतः काजू आणि कोको या उत्पादनांना जागतिक ब्रँड म्हणून प्रस्थापित करण्यावर सरकारचा विशेष कल असून, येत्या काळात सुमारे १० दशलक्ष शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळवण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट या माध्यमातून निश्चित करण्यात आले आहे.२०२६-२७ च्या आर्थिक सर्वेक्षणात भारतीय शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर करण्यासाठी युरिया अनुदान प्रणालीत सुधारणा आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून पोषक तत्त्वांवर आधारित मॉडेल स्वीकारण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. कृषी निर्यातीला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्यासाठी स्थिर व दीर्घकालीन निर्यात धोरणाचे आश्वासन देण्यात आले असून, पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी ठोस आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये ॲग्री बिझनेस नेटवर्कसाठी १६७ कोटी रुपये, उपसा सिंचन योजनांच्या सौर ऊर्जिकीकरणासाठी २०७ कोटी रुपये आणि कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन योजनेसाठी (SMART) ६४६ कोटी रुपयांचा समावेश आहे. या सर्वसमावेशक तरतुदींमुळे तंत्रज्ञान, सिंचन आणि व्यापार या तिन्ही आघाड्यांवर शेती क्षेत्राला मोठी उभारी मिळेल.शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यांसारख्या परस्परपूरक क्षेत्रांसाठी करण्यात आलेल्या भरीव तरतुदींमुळे कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होऊन सर्वांगीण विस्ताराला चालना मिळणार आहे. केंद्र सरकारच्या या क्रांतिकारी योजनांचा लाभ महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सक्षम नेतृत्वाखाली राज्य शासन पूर्ण ताकदीने आणि समन्वयाने काम करण्यास कटिबद्ध आहे.

### देशभरात ५०० नवीन 'अमृत जलाशय' उभारणार

**मत्स्यव्यवसाय आणि पशुपालन क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी अर्थसंकल्पात ठोस तरतुदी करण्यात आल्या आहेत. देशभरात ५०० नवीन 'अमृत जलाशय' उभारून मत्स्य उत्पादकांचे उत्पन्न वाढवण्यासोबतच, मत्स्य संपदा योजनेच्या विस्ताराद्वारे सूक्ष्म उद्योगांसाठी ६,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय, सिंचन सुविधांचा विस्तार आणि काढणीनंतर होणारे नुकसान टाळण्यासाठी विकेंद्रित साठवणूक क्षमता निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. या सर्वसमावेशक प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती घडून येईल.**

# नंदुरबारकरांनो, हेल्मेट घाला आणि जीव वाचवा

## पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस.यांचे कडक आवाहन

दैनिक वादळ वाता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी आणि दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेसाठी नंदुरबार जिल्हा पोलीस दल आता क्शन मोडमध्ये आले आहे. हेल्मेट वापरणे ही केवळ कायदेशीर सक्ती नसून, ते प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी पत्रकार परिषदेत केले. जिल्ह्यात होणाऱ्या अपघातांचे विश्लेषण केले असता, दुचाकीस्वारांच्या मृत्यूला डोक्याला होणारी गंभीर इजा कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. अनेक तरुण आणि कुटुंबप्रमुख केवळ हेल्मेट नसल्यामुळे आपले प्राण गमावत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी आता पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत.

**पोलीस अधीक्षकांच्या आवाहनातील प्रमुख**

**तुमची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे. नंदुरबारकरांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करून हेल्मेट सक्तीचे पालन करावे.**
**– श्रवण दत्त एस., पोलीस अधीक्षक, नंदुरबार.**



**मुद्दे:**–हेल्मेट वापरणे हे केवळ स्वत:साठी नाही, तर तुमच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबासाठी आवश्यक आहे.,विना-हेल्मेट वाहनधारकांवरील कारवाई ही दंड वसुलीसाठी नसून, लोकांचे प्राण वाचवण्यासाठी आहे.,प्रवास छोटा असो वा मोठा, दुचाकी चालवताना कोणत्याही तडजोडीशिवाय हेल्मेटचा वापर करावाशहरासह ग्रामीण भागातही वाहतूक नियमांची अंमलबजावणी कडक केली जाणार आहे. विना-हेल्मेट फिरणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाईसोबतच कायदेशीर प्रक्रियेला सामोरे जावे लागेल, असे संकेत पोलीस दलाने दिले आहेत.

# नंदुरबारमध्ये बनावट जन्म-मृत्यू दाखल्यांचे रॅकेट उद्ध्वस्त; वकिलासह पाच जणांना बेड्या

दैनिक वादळ वाता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

शासकीय यंत्रणेची दिशाभूल करून बनावट जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्रे तयार करणाऱ्या एका मोठ्या टोळीचा नंदुरबार शहर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका वकिलासह पाच जणांना अटक करण्यात आली असून, गेल्या साडेतीन वर्षांपासून हा काळाबाजार सुरू असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.शहरातील शास्त्री मार्केट परिसरातील 'आर. के. ऑनलाईन सायबर कॅफे' मध्ये बनावट शासकीय शिक्क्यांचा वापर करून खोटी कागदपत्रे बनवली जात असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक निलेश देसले यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सदर कॅफेवर छापा टाकला असता, तिथे बनावट दाखले बनवण्याचे मोठे रॅकेट समोर आले.या प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे, सायबर कॅफे चालक आणि नंदुरबार नगरपालिकेतील काही कर्मचाऱ्यांनी संगनमत करून हा गैरप्रकार केल्याचे उघड झाले आहे. १ जून २०२२ ते २९ जानेवारी २०२६ या कालावधीत आरोपींनी शासकीय नोंदींमध्ये फेरफार करून आर्थिक लाभ मिळवला. याप्रकरणी नगरपालिका अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मोठा मुद्देमाल जप्त:-पोलिसांनी केलेल्या छाप्यात बनावट शासकीय शिक्के,तयार केलेले बनावट जन्म-मृत्यू दाखले,लॅपटॉप, संगणक आणि प्रिंटर,मोबाईल फोन इत्यादी साहित्य जप्त करण्यात आले आहे.

### पोलिस अधीक्षकांचे आवाहन

**जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली की, नागरिकांनी कोणत्याही शासकीय कामासाठी केवळ अधिकृत कार्यालये किंवा शासनमान्य केंद्रांचाच आधार घ्यावा. कोणीही एजंट किंवा खासगी व्यक्तीकडून बेकायदेशीर कागदपत्रे घेऊ नका, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व शहर पोलिसांनी यशस्वी केली.**

## वादळी कट्टा

केज नगर पंचायतीत घरकूलाचा नवा खेळ,
घर कमी, हप्ते जास्त-२४१ चा उघडाच मेळ.
गरिबाचं स्वप्न फाईलमध्ये, भिंती मात्र हवेत,
पैसे उचलले पंचायतीत, घरकूल कुठेच दिसेना गावात.

यादीत नाव गरीबाचं, खात्यात मात्र धन,
घर उभं राहिलंच नाही, पण हप्ता झाला संपन्न.
साहेब म्हणे तपास सुरू, फाईल म्हणे चालू,
घरकूल योजनेत केजमध्ये, घोटाळ्याचं राज्य भारी चालू.

फोटोसाठी फीत कापली, भाषणात मोठी बात,
मागे मात्र २४१ कुटुंबांची, आशेची झाली मात.
सिमेंट नाही, विटा नाही, पण सहीला भाव,
घर बांधणं नंतर कधीतरी, आधी उचलला घाव.

योजना केंद्राची गोड, अंमलबजावणी कडू,
गरिबांच्या नावावर लूट, हीच केजचीच जखडू.
घरकूल नाही ही योजना, हा तर उघड घोटाळा,
केज नगर पंचायतीत, भ्रष्टाचाराचाच हा मेळा!

**संपादक**
**अजय भांगे**



# खडक मांजरी येथे प्रा.मनोहर धोंडे सरांचा ६१ वा वाढदिवस उत्साहात साजरा

**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील खडक मांजरी येथे शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष व सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख आदरणीय प्रा. मनोहर धोंडे सर यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त भव्य अभिष्टचिंतन व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम शिवा संघटना शाखा खडक मांजरी, विद्यार्थी आघाडी तालुका शाखा लोहा तसेच ग्रामपंचायत कार्यालय खडक मांजरी यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी आघाडीचे तालुकाध्यक्ष राजकुमार पिल्लोळे, ग्रामपंचायत खडक मांजरीचे सरपंच माधवराव पाटील कापसे, चरण पाटील कापसे व विकास वाघमारे, डॉ . गोविंद जाधव यांच्या वतीने करण्यात आले होते.कार्यक्रमास पोलिस पाटील गौतम वाघमारे, सेवा सहकारी सोसायटीचे



चेअरमन नागोराव पाटील कापसे, ग्रामपंचायत सदस्य संतोष वाघमारे व आनंदराव एडके, माजी सरपंच श्यामराव वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते रामकिशन नरवाडे, परमेश्वर भाऊ वाघमारे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक कलणे सर, मोरे सर, पवार सर,माजी सरपंच चांदोबा एडके, बाबुराव कापसे, भिमराव वाघमारे, माणिका पा. कापसे, गोविंदराव चौगुले, रोजगार सेवक धोंडीबा पा. कापसे, मधुकर नरवाडे, विकास वाघमारे, चांदोबा गणगोपले, विठ्ठल वारकड, दलित वाघमारे, विकास एडके, संतोष कापसे, चंद्रकांत वाघमारे,सोनाजी खराटे, माधव बडवणे, बळीराम पा. कापसे, पिराजी पाटील कापसे, सुर्यकांत कतुरे, उत्तम एडके,दिपक कापसे, यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी, विद्यार्थी वर्ग व मित्रपरिवार उपस्थित होता.यावेळी सर्व गावकरी मंडळींच्या वतीने प्रा. मनोहर धोंडे सरांचा भव्य दिव्य सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे (वही-पेन) वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध, क्रांतिसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. फटाक्यांच्या आतषबाजीत व जल्लोषात प्रा. मनोहर धोंडे सरांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमामुळे खडक मांजरी परिसरात आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. समाजकार्य, शिक्षण आणि संघटनात्मक कार्यात प्रा. मनोहर धोंडे सरांनी दिलेल्या योगदानाबद्दल उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# संपादकीय

## विदर्भात सत्ता स्थापनेचा खेळ

अकोल्यात भारतीय जनता पक्षाच्या शारदा खेडकर यांची महापौरपदी निवड झाली, तर नागपूरमध्ये भाजपची पकड मजबूत असताना अमरावतीत सत्ता निश्चित होत आहे, मात्र चंद्रपूरमध्ये राजकीय संघर्षाने चित्र अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे.महाराष्ट्रात महापालिका निवडणुकांचे निकाल लागून आता दोन आठवडे उलटलेले आहेत. विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या चारही महापालिकांमध्ये महायुतीची सत्ता येईल असे चित्र सुरुवातीला वाटत होते. त्यानुसार अकोल्यात भारतीय जनता पक्षाच्या शारदा खेडकर यांची महापौरपदी निवड झाली आहे, तर नागपूरमध्ये ६ फेब्रुवारीला भारतीय जनता पक्षाचाच महापौर निवडला जाईल हे नक्की आहे. मात्र अमरावती आणि चंद्रपूर येथे आजही परिस्थिती काहीशी अनिश्चित वाटत आहे. त्यातही अमरावतीत आता परिस्थिती आटोक्यात आली असल्यासारखे दिसते आहे मात्र चंद्रपुरात अजूनही मारामारी सुरूच आहे.नागपूरमध्ये १५१ जागांपैकी भाजपने १०२ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे त्यांना कोणाच्याही मदतीची गरज नाही. ते स्वबळावरच सर्व पदांवर दावा सांगू शकतात. मात्र शिंदे सेनेला ते एखादी तरी जागा देतील अशी शक्यता बोलली जात आहे. त्याचप्रमाणे रिपब्लिकन आठवले गटाला सुद्धा ते सत्तेत सहभागी करतील हे देखील निश्चित आहे. कारण नागपुरात रिपब्लिकन मतांचा जो जोर असलेला भाग आहे, तिथे हा भाग भविष्यातही भाजपसोबतच यावा यासाठी ही रणनीती असेल असे बोलले जाते.याचवेळी नागपुरात भारतीय जनता पक्षाने कठोर आत्मपरीक्षण करण्याची देखील गरज राजकीय विश्लेषक बोलून दाखवत आहेत. २०१७ मध्ये नागपुरात भाजपला १०८ जागांवर विजय मिळाला होता. मात्र यावेळी ती संख्या १०२ वर घसरलेली आहे. नागपुरातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्वच भाजप नेते निवडणुकीपूर्वी आम्ही १२० जागा जिंकू असा दावा करत होते. मात्र शून्याची जागा बदलली असल्यामुळे १२० चे १०२ झाले आहेत. हे बघता भाजपची रणनीती कुठेतरी चुकली असेही बोलले जाते आहे.भाजपच्या जागा कमी होण्यामागे विदर्भात नागपुरात एमआयएमचे जे काही प्रस्थ वाढले ते देखील लक्षात घेणे गरजेचे झाले आहे. काही दिवसांपूर्वी नागपूरच्या मुस्लीमबहुल भागात दंगल झाली आणि ती इकडे शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत पोहोचली होती. त्यावेळी त्या काही घटना घडल्या त्याचेच पर्यावसान एमआयएमचे वर्चस्व वाढवण्यात झाले असल्याचे बोलले जात आहे. या दंगलीच्या प्रमुख सूत्रधार म्हणून त्याला अटक झाली होती त्याची पत्नीच एका प्रभागातून विजयी झाली आहे. त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्षात जागा वाटपामध्ये जे काही गोंधळ झाले त्यामुळे देखील पक्षाला काही जागांचा फटका बसला हे निश्चित आहे. उमेदवार निवडताना काही ठिकाणी बाहेरच्या पक्षातून आलेल्या उमेदवारांना प्राधान्यक्रम देत जुन्या जाणत्यांना अंगठा दाखवला गेला. त्याचप्रमाणे बाहेरच्या प्रभागातील उमेदवारांना भलत्याच प्रभागात लादले गेले. अखेरच्या क्षणापर्यंत याद्या जाहीर केल्या नाहीत आणि उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी उमेदवारांना बोलावून बी फॉर्म दिले गेले. त्यामुळे जो काही गोंधळ झाला त्याचा परिणाम मतदारांवर देखील झाला आहे.त्याचबरोबर कॉंग्रेसमध्ये नवे शहराध्यक्ष विकास ठाकरे यांनी जो नियोजनबद्ध प्रचार केला आणि योग्य असे उमेदवार निवडले त्याचाही फटका भाजपला बसल्याचे बोलले जात आहे. विकास ठाकरे हे धडाकेबाज नेते म्हणून ओळखले जातात त्याचाच फायदा कॉंग्रेसला झाल्याचे बोलले जात आहे.अमरावतीत जरी भाजपला स्पष्ट बहुमत मिळालेले नसले तरी राणांच्या युवा स्वाभिमान पक्षाने त्यांना निर्विवाद पाठिंबा दिला आहे. त्यामुळे भाजप राणांचा पक्ष आणि काही अपक्ष म्हणून अमरावतीत भाजपची सत्ता येईल हे आता निश्चित झाले आहे. ६ फेब्रुवारीला अमरावतीत महापौर, उपमहापौरांची निवडणूक होणार आहे त्या दिवशी चित्र स्पष्ट होईल.चंद्रपूरमध्ये मात्र आज काय होईल हे सांगणे कठीण आहे. तिथे भाजपमध्ये आमदार किशोर जोरगेवार आणि आमदार सुधीर मुनगंटीवार या दोघांच्या भांडणामुळे आणि शहराध्यक्षांनी ऐनवेळी उमेदवार यादी बदलल्यामुळे भाजपला जागा कमी मिळाल्या आणि कॉंग्रेस हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. शिवसेना उबाठा गटाच्या मदतीने कॉंग्रेस तिथे सत्ता मिळवू शकेल असे चित्र होते. मात्र मिळालेल्या माहितीनुसार शिवसेना उबाठा पक्षाने तिथे अवघ्या सहा जागांच्या जोरावर पहिली अडीच वर्षे महापौरपद मागितले आहे, तर २७ जागा घेणाऱ्या कॉंग्रेसमध्ये शिवसेनेला महापौर पद देऊ नये असा मतप्रवाह आहे. त्यामुळे परिस्थिती डामाडौल आहे.त्याचवेळी कॉंग्रेसमध्ये खासदार प्रतिभा धानोरकर आणि आमदार विजय वडेट्टीवार यांच्यातला संघर्ष उफाळून आला आहे. दोघांनीही नगरसेवकांचे वेगवेगळे गट तयार केले असून एका गटाने सर्व सदस्यांची नोंदणी करून टाकली आहे. त्यामुळे जास्तच गोंधळाची परिस्थिती झाली आहे. त्यात वडेट्टीवार गटाचे नगरसेवक बसने जात असताना त्यांच्यावर हल्ला केल्याची घटना घडली आणि ही घटना धानोरकर गटाने घडवून आणल्याचा दावा केला जात आहे. त्यातील एक हल्लेखोर पकडला गेला असून त्याच्याकडून ही माहिती मिळाल्याचे सांगितले जात आहे.इथे कॉंग्रेसवासी असलेले विजय वडेट्टीवार आणि प्रतिभा धानोरकर हे दोघेही मूळ शिवसैनिकच आहेत. विजय वडेट्टीवार २००५-६ या दरम्यान नेते नारायण राणे यांच्या समवेत शिवसेनेतून कॉंग्रेसमध्ये आले. कॉंग्रेसमध्येच वाढत वाढत ते आता विरोधी पक्षनेते पदापर्यंत पोहोचण्याच्या तयारीत आहेत. प्रतिभा धानोरकर यांचे पती बाळू धानोरकर हे २०१९ पर्यंत शिवसैनिकच होते. त्यावेळी ते शिवसेनेचे आमदार होते आणि त्यांना लोकसभेची उमेदवारी हवी होती.मात्र ही जागा युतीमध्ये भाजपसाठी सोडलेली असल्यामुळे त्यांनी शिवसेना पक्ष सोडून कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आणि कॉंग्रेसची उमेदवारी घेऊन भाजपचे उमेदवार आणि तत्कालीन केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहिर यांना पराभव करत ते खासदार म्हणून निवडून आले. नंतर बाळू धानोरकर यांचे निधन झाल्यावर प्रतिभा धानोरकर यांना पक्षाने उमेदवारी दिली आणि त्या विद्यमान खासदार आहेत. मात्र वडेट्टीवार आणि धानोरकर या दोघांमध्ये विस्तवही जात नाही. त्यामुळे आता महापौर कोणत्या गटाचा करायचा यावर वाद सुरू असल्याची माहिती आहे. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दोन्ही गटांना एकत्र बसवून तडजोड करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यातून काहीही साध्य झाले नाही. परिणामी दोघांमध्ये चांगलेच भांडण सुरू आहे. याच दरम्यान भारतीय जनता पक्षाचे जिल्ह्यातील नेते सुधीर मुनगंटीवार हे मात्र महापौर आमचाच होणार असा दावा करीत आहेत. त्यांना या दोन दिग्गजांच्या भांडणाचा कितपत फायदा मिळेल त्यावरच चंद्रपूरचा महापौर कोणाचा होणार हे भविष्य ठरणार आहे.

# शालेय बीज प्रदर्शनातून २५ हजार विद्यार्थ्यांमध्ये पेरली पर्यावरण संवर्धनाची बीजे

## 'वी वी फॉर एनवायरमेंट'चा ५० शाळेत यशस्वी उपक्रम;३ फेब्रुवारीला रंगणार पारितोषिक वितरण समारंभ; पद्मश्री चैतरामजी पवार यांची प्रमुख उपस्थिती



दैनिक वादळ वार्ता

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन निसर्ग, शेती आणि देशी बियाण्यांशी विद्यार्थ्यांचे नाते जोडण्यासाठी 'WE We For Environment' संस्थेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राबविण्यात आलेला 'शालेय बीज प्रदर्शन' (Seed Exhibition) हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला आहे. जिल्ह्यातील ५० शासकीय व खासगी शाळांमधील सुमारे २५,००० विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला असून, या उपक्रमाचा भव्य बक्षीस वितरण, समारोप व सत्कार समारंभ उद्या, मंगळवार दिनांक ३ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे.

२०० हून अधिक बियाण्यांची ओळख आजची पिढी निसर्ग आणि शेतीपासून दूर जात असताना, त्यांना जैवविविधतेचे महत्त्व समजावे या हेतूने ही संकल्पना राबवण्यात आली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना २०० हून अधिक प्रकारच्या भारतीय व देशी बियाण्यांची माहिती देण्यात आली. आजी-आजोबा आणि स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधून विद्यार्थ्यांनी स्वतः बियाणे संकलित केले, ज्यामुळे त्यांच्यात संशोधन वृत्ती आणि संवाद कौशल्य विकसित झाले.

**विविध स्पर्धा आणि ३०० विजेते**

केवळ प्रदर्शनच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्मरणशक्ती स्पर्धा, माहिती सादरीकरण, बीज ओळख आणि पर्यावरण विषयक उपक्रम अशा चार स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यातून निवडल्या गेलेल्या ३०० गुणवंत विद्यार्थ्यांना ३ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

**समारोप समारंभ आणि मान्यवर**

या सोहळ्यासाठी ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ पद्मश्री चैतरामजी पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

**या उपक्रमाच्या यशासाठी महत्त्वाचे योगदान**

सौ. मेघना बडजाते (अध्यक्षा, वी फॉर एनवायरमेंट),श्री. संजय अंबेकर (कार्याध्यक्ष),डॉ. संजय डांभारे (डीन, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय),श्री. युनूस पटेल व श्री. किरण मास्टर (मुख्याध्यापक संघ)

यासोबतच डॉ. शुभदा कोराने, कैलास राठोड आणि शिक्षक प्रतिनिधींनी विशेष परिश्रम घेतले.

# अंधेरी विधानसभा मतदारसंघातील तीन भाजप नगरसेवक यांचे ओबीसी प्रमाणपत्र बनावट असल्याचा आरोप

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज भारतीय जनता पक्ष मुंबई महानगरपालिकेत महापौरपदाच्या विजयाचा आनंद साजरा करत असतानाच, अंधेरी विधानसभा मतदारसंघातील तीन भाजप नगरसेवकांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. या तीन नगरसेवकांनी बनावट ओबीसी प्रमाणपत्रांच्या आधारे निवडणूक लढविल्याचा गंभीर आरोप करत त्यांच्या विरोधात न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित नगरसेवकांच्या अपात्रतेची शक्यता निर्माण झाली असून, भाजपसाठी हे प्रकरण अडचणीचे ठरण्याची चिन्हे आहेत.



प्रभाग क्रमांक ७२ मधून नवनिर्वाचित भाजप नगरसेविका ममता पंकज यादव यांच्या विरोधात शिवसेना (ज्वाला) पक्षाच्या उमेदवार मनीषा पांचाळ यांनी याचिका दाखल केली आहे. यामध्ये यादव यांनी ओबीसी प्रमाणपत्रासाठी बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, प्रभाग क्रमांक ७६ मधील भाजप नगरसेवक प्रकाश मुसळे यांच्या विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार रसर भाटकर, बंधित बहुजन आघाडीचे मुंबई सचिव संजीव कस्कोरी तसेच वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार परेश केळसकर यांचे प्रस्तावक यांनी संयुक्तपणे आक्षेप नोंदवला आहे.

तसेच प्रभाग क्रमांक ८० मधील भाजप नगरसेविका दिशा सुनील वड यांच्या विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार एकताराम कुटुंब आणि वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार परेश केळसकर यांनी आक्षेप घेतला आहे.

याचिकांमध्ये असा आरोप करण्यात आला आहे की संबंधित नगरसेवकांनी ओबीसी प्रमाणपत्राच्या आधारे राखीव जागांवर निवडणूक लढवून जनतेची दिशाभूल केली. ओबीसी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करून त्यांचा वापर करण्यात आल्याचा तसेच नामांकन प्रक्रियेदरम्यान या कागदपत्रांचा गैरवापर झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

याशिवाय, उमेदवारी अर्ज आणि प्रतिज्ञापत्रांमध्ये गुन्हेगारी खटले, मालमत्तेचा तपशील व अन्य कायदेशीरदृष्ट्या आवश्यक माहिती लपवण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. हे लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ तसेच निवडणूक नियमांचे थेट उल्लंघन असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

कायदेशीर तज्ज्ञांच्या मते, जर हे आरोप न्यायालयात सिद्ध झाले, तर संबंधित नगरसेवकांना तात्काळ अपात्र ठरवले जाऊ शकते, त्यांची निवडणूक रद्द होऊ शकते आणि फौजदारी कारवाईलाही सामोरे जावे लागू शकते. बनावट कागदपत्रांच्या आधारे जात प्रमाणपत्र मिळवणे हा भारतीय दंड संहितेनुसार दंडनीय गुन्हा आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपच्या काही वरिष्ठ नेत्यांना या नगरसेवकांच्या जात प्रमाणपत्रांबाबत आधीच माहिती होती, तरीही त्यांना उमेदवारी देण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. केंद्र आणि राज्यात सत्ता असल्यामुळे कायदेशीर अडथळे कमी होतील, या समजुतीतूनच हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोपही केला जात आहे.एकूणच, अंधेरी विधानसभा मतदारसंघातील हे प्रकरण भाजपसाठी केवळ कायदेशीरच नव्हे तर राजकीय विश्वासार्हतेचीही मोठी परीक्षा ठरणार आहे. आता या प्रकरणात निवडणूक आयोग आणि न्यायालय काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# केज पंचायत समितीचा महत्त्वाचा निर्णय ग्रामसभेचे व्हिडिओ चित्रिकरण अनिवार्य

## ग्रामसभा गट विकास अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत घेण्यात येणार ग्रामसभेत १५ वा वित्त आयोग खर्चास मान्यता मिळणार;सुभाष सखाराम सारुक यांच्या मागणीला यश

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत स्तरावरील कामकाज अधिक पारदर्शक आणि वादमुक्त करण्यासाठी पंचायत समिती केज यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.ग्रामपंचायत जिवाचीवाडी ता.केज जि. बीड येथे गटविकास अधिकारी यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ग्रामसभा घेऊन तिचे व्हिडिओ चित्रिकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.या ग्रामसभेत विहिरीसाठी लाभार्थी निवड तसेच पंधरावा वित्त आयोग अंतर्गत खर्च मंजुरीचा विषय हाताळला जाणार आहे.पंचायत समिती कार्यालयाकडून सरपंच व ग्रामसेवक यांना पाठविण्यात आलेल्या अधिकृत पत्रानुसार, संबंधित विषयावर आलेल्या अर्ज आणि वरिष्ठ स्तरावरील पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात येत आहे. अर्जदार श्री.सुभाष सखाराम सारुक मु.पो. जिवाचीवाडी,ता.केज यांनी केलेल्या मागणी वरून हा विषय पुढे आला असल्याचे पत्रात नमूद आहे.



**काय आहेत प्रमुख सूचना?**

ग्रामसभा गटविकास अधिकारी (इऊ्ज) यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत घेण्यात यावी.संपूर्ण ग्राम सभेचे व्हिडिओ चित्रीकरण करणे आवश्यक राहील. विहिरीसाठी पात्र लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेतच करावी.

पंधरावा वित्त आयोग निधीतून होणाऱ्या खर्चास ग्रामसभेत मंजुरी घ्यावी.

ग्रामसभेनंतर झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पंचायत समिती कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

**पारदर्शकतेवर भर.**

ग्रामपातळीवरील निधी वाटप व लाभार्थी निवड प्रक्रियेत अनेकदा तक्रारी येत असल्याच्या पार्श्वभूमी वर ही कारवाई महत्त्वाची मानली जाते.व्हिडिओ चित्रिकरणामुळे भविष्या तील वाद टाळण्यास मदत होणार असून निर्णय प्रक्रियेची पारदर्शकता वाढणार आहे.

**प्रशासनाचा स्पष्ट संदेश**

पंचायत समिती केज यांनी ग्रामपंचायतींना स्पष्ट शब्दांत सूचित केले आहे की,नियमांचे पालन करूनच कार्यवाही करावी आणि त्याचा लेखी व दृश्य पुरावा कार्यालयात सादर करावा.यामुळे गाव पातळीवरील विकासकामे आणि निधी वापरावर अधिक देखरेख राहणार आहे.या निर्णयामुळे जिवाचीवाडी ग्राम पंचायतीतील पुढील ग्रामसभा आता प्रशासनाच्या देखरेखी खाली आणि नोंदणीकृत पद्धतीने पार पडणार असल्याने गावकऱ्यांचे लक्ष या बैठकीकडे लागले आहे.दरम्यान प्रसार माध्यमांनी ही या संदर्भात बातम्या प्रकाशित केल्या होत्या.

# रिलायन्स फाउंडेशन स्कूलचा मनमानी कारभार कर्मचाऱ्यांचे होतेय शोषण!

**कर्जत । प्रतिनिधी**

महाराष्ट्र खासगी शाळांतील कर्मचारी (सेवा अटी) विनियमन अधिनियम १९७७ व नियमावली १९८१ यांची आदेशाची पायमल्ली करत रिलायन्स फाउंडेशन स्कूल, लोधिवली प्रशासनाने तब्बल २५ ते ३० वर्षे सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी, थकबाकी व सेवा-सुरक्षेपासून वंचित ठेवले आहे. ही साधी प्रशासकीय चूक नसून नियोजनबद्ध अन्याय, शोषण आणि कायद्याची थट्टा आहे. मा. मुंबई उच्च न्यायालय तसेच शिक्षण विभागाचे स्पष्ट व बंधनकारक आदेश असतानाही संस्थेने त्यांची अंमलबजावणी न करता थेट उल्लंघन केले आहे. शासन आदेशांना केराची टोपली दाखवत कर्मचारी वर्गाची आर्थिक व मानसिक पिळवणूक सुरूच असून, शिक्षणसंस्थेऐवजी ही संस्था आता शोषण केंद्र बनली असून कामगारांचे भवितव्य धोक्यात आले आहे. तक्रारदार अमोल किसन सांगळे यांनी १३/११/२०२५ रोजी जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), महारूद्र नाळे रायगड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली. १७/११/२०२५ रोजी मुख्याध्यापक धिरेंद्र हरभोळा यांनी म्हणणे सादर केले. मात्र त्यानंतरही कारवाई न झाल्याने ०८/१२/२०२५ रोजी तक्रारदारांनी प्रत्यक्ष जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), महारूद्र नाळे यांची भेट घेऊन न्यायाची मागणी केली.

१८ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती, ती रद्द करून २७/०१/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदारांनी अंतिम लेखी युक्तिवाद सादर करत धक्कादायक वास्तव समोर आणले - संस्थेत किमान २४ कर्मचारीगेली २५-३० वर्षे नियमित व कायमस्वरूपी कार्यरत असताना त्यांना मुद्दाम कंत्राटी / कंपनी कामगार म्हणून दाखवून MEPS कायद्यापासून पळ काढण्यात आला आहे. हे कृत्य MEPS Act 1977 चे कलम ५, ७, ८ तसेच Rules 198१ मधील नियम ९, १० व १३ यांचे सरळसरळ उल्लंघन आहे. व्यवस्थापनाने संगनमताने कर्मचाऱ्यांची फसवणूक केल्याने खझ्ाउ ४२० (फसवणूक), ४०६ (विश्वासघात), १२०-इ (कटकारस्थान) अंतर्गत गुन्हे दाखल होण्यास पात्र आहे उच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर पालन न करता रिलायन्स फाउंडेशन स्कूल प्रशासनाने Rule of LawbmM खुलेआम आव्हान दिले आहे - हे लोकशाही व्यवस्थेसाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते. तक्रारदारांच्या ठोस मागण्या :१) रिलायन्स फाउंडेशन स्कूल, लोधिवली यांची शैक्षणिक मान्यता तात्काळ रद्द करावी.२)अध्यक्ष, व्यवस्थापक, मुख्याध्यापक व लोकल कमिटी चेअरमन यांच्यावर खझ्ाउ ४२० सह फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्यावेत.३)सर्व पात्र कर्मचाऱ्यांना कायम घोषित करून संपूर्ण थकबाकी वेतन व कायदेशीर लाभ अदा करावेत.४)न्यायालयीन आदेशांच्या अवमानाबाबत स्वतंत्र अहवाल शासनाकडे सादर करावा.

# रस्ता अपघातातील तरुणाचा प्राण वाचविण्यासाठी धडपड केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे सन्मानित

## अपघातग्रस्त तरुणास जीवदान देणाऱ्या ढाकणे दाम्पत्याचा लोकशाही पत्रकार संघाकडून सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

मौजे जोला (ता. केज) येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई बाजीराव ढाकणे व सामाजिक कार्यकर्ते बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी गुरूवार दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी केज - बीड रोडवरील आंबाळाच्या बरडाच्या पुर्वेस असलेल्या पुलाजवळ रस्त्यालगतच्या खड्ड्यांमध्ये बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या अपघातग्रस्त तरुणास वेळेत मदत करून माणुसकीचा आदर्श निर्माण केला. अपघातग्रस्त धिरज भानुदास भवर (मु. आष्टा हरीनारायण, ता. आष्टी) या तरुणास त्यांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेतून बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.



अपघातानंतर जखमी तरुण गंभीर अवस्थेत असल्याचे लक्षात येताच ढाकणे दाम्पत्याने क्षणाचाही विलंब न करता १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधला. वेळेत रुग्णालयात दाखल केल्यामुळे जखमीवर तातडीचे उपचार सुरू होऊ शकले आणि त्याचा जीव वाचण्यास मदत झाली. संकटाच्या वेळी धावून जाऊन केलेली ही मदत समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.

या सन्मान सोहळ्याला बीड जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वाचनालय संघाचे डॉ. राजेंद्र सानप, बीड नगरपालिकेचे नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे, लोकशाही पत्रकार संघाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ. सुनंदा केदार, बीड शहर वाहतूक शाखेचे मुंडे साहेब, शिंदे साहेब, गाडे साहेब, शेख मॅडम, लोकशाही पत्रकार संघाचे अध्यक्ष भागवत वैद्य, मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ, पाटील साहेब, बीड जिल्हा संघटक तथा पत्रकार संजय देवा कुलकर्णी (कुक्कडगावकर), प्रकाश गाडे, पत्रकार किशोर देवा कुलकर्णी यांच्यासह लोकशाही पत्रकार संघाची संपूर्ण टीम उपस्थित होती.यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी ढाकणे दाम्पत्याच्या कार्याचे विशेष कौतुक करत, अपघातस्थळी मदतीला धावून जाणे हीच खरी समाजसेवा आहे. अशा माणुसकीच्या कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो, असे मत व्यक्त केले. तसेच नागरिकांनी अपघात पाहिल्यास भीती न बाळगता जखमींना तातडीने मदत करावी, असे आवाहनही करण्यात आले.सत्कार स्वीकारताना ढाकणे दाम्पत्याने, अपघातातील जखमीला वेळेत मदत मिळणे अत्यंत गरजेचे असते. प्रत्येक नागरिकाने माणुसकीच्या नात्याने पुढे येणे आवश्यक आहे, अशी भावना व्यक्त केली.

---

### भाग्यनगर साहित्य सेवा संगमचा २३ वा स्थापना दिवस उत्साहात

# डिजिटल प्लॅटफॉर्मकडे वाटचाल आवश्यक-गजानन बिडकर

दैनिक वादळ वार्ता
**हैदराबाद । प्रतिनिधी**

भाग्यनगर सरस्वती साहित्य सेवा संगमचा २३ वा स्थापना दिवस उत्साहपूर्ण वातावरणात आणि हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली.त्यानंतर सरस्वती वंदना सादर करण्यात आली.या सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून श्री रोहित चेबरोलु, श्री.गजानन बिडकर, झारखंड एकता मंचचे श्री.जयंत शर्मा व श्री.राजू देशपांडे यांची विशेष उपस्थिती लाभली.संस्थेचे अध्यक्ष श्री.उदयकुमार नाईक यांनी संस्थेच्या २३ वर्षांच्या कार्यकाळाचा आढावा घेत विविध साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती दिली.सचिवांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावीपणे पार पाडले.प्रमुख



पाहुणे श्री.गजानन बिडकर यांनी संस्थेचे यशस्वी वाटचालीबद्दल अभिनंदन करत 'पत्रकारिता व आव्हाने' या विषयावर विचार मांडले.'भाषा सेतू' या त्रैमासिकाला डिजिटल प्लॅटफॉर्मवर नेण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.संस्थेची स्वतंत्र वेबसाईट तयार करून साहित्यिक विचार जगभर पोहोचवावेत तसेच युवा पिढीला संस्थेशी जोडून त्यांच्या कल्पनांना वाव द्यावा,असे मार्गदर्शन त्यांनी केले.आपल्याला विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी अध्यक्ष व संपूर्ण टीमचे आभार मानले.यानंतर श्री.जयंत शर्मा यांनी समाजात एकता व संघटन शक्ती वाढविण्याचे महत्त्व स्पष्ट केले.श्री.राजू देशपांडे यांनी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा स्थानिक स्तरावर सन्मान केल्यास इतरांना प्रेरणा मिळते,असे प्रतिपादन केले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'भाषा सेतू' त्रैमासिकाच्या चालू अंकाचे प्रकाशन करण्यात आले.अंकाच्या संपादकीय,रचना व पृष्ठ मांडणीबद्दल प्रधान संपादक व संपादक मंडळाचे विशेष कौतुक करण्यात आले.संस्थेच्या ज्येष्ठ सदस्या लता संधी मॅडम यांनी यूजीसीवर आधारित आधुनिक कविता सादर केली.कोंडे सर प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांनी संदेश पाठवून अल्पोपहाराची व्यवस्था केली.कार्यक्रमाचा समारोप श्री.मिलिंद पाठक यांनी केला. संस्थेचे कार्य व त्रैमासिक डिजिटल माध्यमातून पुढे नेण्यासाठी संस्था सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तुम्मा जनार्दन,चंद्रकांत जामवाले तसेच पी. नारायणा, मानसी पाठक, अंकिता पाठक,अर्चना जोशी,गिरीश बिडकर, गौरव बिडकर,माधुरी बिडकर,प्रतीक पाठक आदींचा उत्स्फूर्त सहभाग व प्रतिसाद लाभला.

---

# नरसी येथे गुरु रविदास महाराजांना अभिवादन




दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतीनिधी**


राष्ट्रसंत संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त नरसी (ता. नायगांव) येथील गुरु रविदास मंदिर प्रेरणा केंद्र व ग्रामपंचायत कार्यालय येथे अभिवादन करण्यात आले आहे . आज दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी माघ पौर्णिमेला क्रांतीकारी महामानव विज्ञानवादी विचारवंत जगद्गुरु गुरु रविदास महाराज यांची ६२८ वी जयंती सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे . त्या अनुषंगाने नरसी येथे गुरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेस महाआरती करुन अभिवादन करण्यात आले यावेळी सरपंच गजानन भिलवंडे , गुरु रविदास महाराज सार्जवजनिक जयंती मंडळाचे अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार गंगाधरराव गंगासागरे , सचिव माधव गंगासागरे , सटवा बरबडे , बाबू गंगासागरे , रोहीदास गंगासागरे , शैलेश गंगासागरे , पांडूरंग गंगासागरे , गंजानन गंगासागरे , जळबा बरबडे , बालू बरबडे , शषीकला कांबळे , संतोष कांबळे , अजय कांबळे आदी समाजबांधव उपस्थीत होते .

---

# भगवान श्रीकृष्ण आश्रम येथे रामकथा व महा विष्णु याग मंडपाचे संत महंत व भाविक भक्तांनी केले पुजन,मंडप उभारणी साठी १ महीना लागणार,राजस्थानातील कारागीर दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील बीड रोड वरील भगवान श्रीकृष्ण आश्रम येथे रामकथा व महा विष्णु याग मंडपाचे संत,महंत व भाविक भक्तांनी दि.२ फेब्रुवारी सोमवार रोजी पुजन केले, मंडप उभारणी साठी १ महीण्याचा कालावधी लागणार असुन राजस्थान येथील कारागीर दाखल झाले आहेत.यावेळी धर्म ध्वजारोहण करण्यात आले असुन पुरोहित श्री.रमेशराव कुलकर्णी तांबवेकर गुरुजी यांनी मंत्रोच्चाराच्या घोषात पुजन करण्यात आले. यावेळी साधना स्थली लाडे वडगाव येथील स्वामीजी ह.भ.प.श्री. भारतानंद सरस्वतीजी, भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री, ह.भ.प.विष्णु महाराज शास्त्री यांच्या सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुजना नंतर पुंडलिक वरदा हारी विठ्ठल



श्री ज्ञानदेव तुकाराम मंत्रांच्या जय घोषात भक्तांनी श्रीफळ वाढवून मंडप उभारणीचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी ह.भ.प.स्वामी भारतानंदजी सरस्वती यांनी आशिर्वादपर मार्गदर्शन केले.यामध्ये त्यांनी भागवत भुषण ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांचा हेतु प्रांजळ असुन तो सिद्धीस जाणार आहे.समाजातील गोर गरीब,शोषित,वंचीत, दिव्यांग बांधवांना दरवर्षी गरीबांची दिवाळी साजरी करुन त्यांना जीवनासाठी आवश्यक साहित्याचे वाटप करून गोडधोड भोजन देऊन दिवाळी सण साजरा केला जातो. सर्व भाविक भक्तांनी सढळ हातांनी सहकार्य करावे व रामकथा व महा विष्णु यागामध्ये सहभागी व्हावे व भव्यदिव्य भगवान श्रीकृष्ण मंदिर उभारणीच्या पवित्र सोहळ्याचे साक्षीदार व्हावे असे आवाहन केले.

महाप्रसाद घेऊन हा कार्यक्रम संपन्न झाला.

---

# कारला पंचायत समिती गणात भाजपचे राम दिपक बिराजदार यांना मतदाराचा वाढता पाठींबा

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

खरोसा जिल्हा परीषद गटातील कारला पंचायत समिती गणातील भारतीय जनता पार्टीचे अधिक्रत उमेदवार तांबरवाडीचे उपसरपंच राम दिपक बिराजदार यांच्या नावाने होत असलेला विकासाचा बोलबाला असल्याने कारला मतदार संघातील तांबरवाडी राजेवाडी गावला विकासाचे मॉडेल करुन भारतीय जनता पक्षाचे अधिक्रत उमेदवार मनुन कारला गणातुन निवडणुक रींगणात निवडणुक लधढवत असुन खरोसा जिल्हा परीषद मतदार संघातील सर्वांगीण विकासाला चालणा देण्यासाठी कारला पंचायत समिती निवडणुक लढवत असल्याच उमेदवार राम बिराजदार यांनी सांगीतले ,



खरोसा जिल्हा परीषद गटासह कारला पंचायत समितीतील लोकांच्या समस्या रस्ते ,विज ,पाणी,गटार ,शिक्षण व महिला सक्षमीकरण सह अनेक प्रलंबित विकासकामे करण्यासाठी मला कारला गणातुन निवडणुक लढण्यासाठी भारतीय जनता पक्षाने व आ.अभिमन्यु पवार साहेबांच्या नेञत्वाखाली मला निवडणुक लढण्याची संधि दीली असुन या संधीच सोण करण्यासाठी मी सदैव प्रयत्नशिल असेन त्यासाठी जनतेने मतदान रुपी आशिर्वाद द्यावा ,अस आवाहन कारला पंचायत समिती गणातील उमेदवार उपसरपंच राम बिराजदार यांनी केले आहे , मला भारतीय जनता पक्षाने तिकीट देउन कारला गणातील प्रत्येक गावला स्मार्ट व्हिलेज करण्याचा माझा संकल्प आहे पण मतदार संघातील मतदारांनी आपली सेवा व कारला गणाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मला मतदान रुपी आशिर्वाद द्यावा ,

---

# वडवणीत सर्वपक्षीय शोकसभेत स्व.अजीत दादांच्या आठवणीने आनेकांना गहिवरून आले देऊन मोठ्या प्रमाणात विकास

दैनिक वादळ वार्ता
**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी प्रतिनिधी- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाल्या नंतर. त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती च्या प्राणंगनात तालुक्यातील सर्व पक्षीय व नागरिकांच्या वतीने शोकसभा आयोजीत केली होती. यावेळी संपूर्ण राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा देतांनाअनेकांचे मन गहिवरून आले होते. तर श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमांत प्रथम उपस्थित सर्व पक्षीय, सामाजिक कार्यकर्ते यांनी दिवंगत अजित दादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद भूषवल्यापासून बीड जिल्हा वासियांना विकासाची आस लागली होते. वडवणीच्या विकास कामांना भरघोस निधीकरणार असल्याचे आश्वासन

अजित दादांनी दिले. अनेक कामांना निधीची पूर्तता ही केली होती. राहिलेल्या विकास कामांना नाही निधी देणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले होते. यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करण्यात येऊन त्यांना हे दुःख सहन करण्याचे बळ लाभो. अशी प्रार्थना करण्यात आली. यावेळी वडवणी तालुक्यातील अनेक राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्यांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन श्रद्धांजली वाहण्यात आली. व पसायदान म्हणून शोकसभेची सांगता करण्यातआली.वडवणीत सर्वपक्षीय शोकसभेत स्व. अजीतउपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या सेवाकाळात नेहमी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यभावनेने शासकीय कर्तव्य पार पाडले. त्यांच्या निधनाने राज्य शासनाने एक कर्तव्यदक्ष, शिस्तबद्ध आणि वक्तशीर नेतृत्व गमावले आहे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केल्या यावेळी नगराध्यक्ष शेषराव बापू जगताप, बाजार समितीचे संचालक विश्वनाथ शिंदे, संचालक सचिन भैय्या लंगड़े, माजी सभापती प्रशांत बापू सावंत, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते बाबरी मुंडे, दादासाहेब भंडारे,श्री शिवप्रसाद माळवदे, कृषी असो अशोकराव गोंडे, मा.ता.अध्यक्ष मच्छिंद्र बप्पा झाटे, . भास्कर उजगरे, शिवसेना शिंदे गटाचे रविराज बडे,भाई रामदास ढगे, युवराज शिंदे, उबाठाचे शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, मा.जि.प. सदस्य बी. एम. पवार, सर्जेराव महाराज आळणे, ऊसतोड मुकादम संघटनेचे संजय तिडके, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते भारत दादा जगताप, प्राचार्य सोमनाथ बडे, युवानेते सतीष बप्पा बडे, युवा उद्योजक संतोष डावकर,भा.ज.पा.युवाजिल्हा अध्यक्ष संजय आंधळे, वृक्ष मित्र सुधाकर देशमुख, श्रीराम मुंडे, रा. कॉ.चे गणेश म्हेत्रे, तालुका अध्यक्ष बजरंग आप्पा साबळे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष ऍड माधव काका शेंडगे,ह.भ.प.विठ्ठलशास्त्री महाराज, इंदिरा काँग्रेस नेते दादासाहेब मुंडे, प्रा. प्रकाश जेधे, सभापती संभाजी तात्या शिंदे, पत्रकार संघ मुंबई चे वडवणी तालुका अध्यक्ष अशोक निपटे , कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नारायण भाऊ शेळके यांनी केले.





# बोरदच्या तरुणाईने फुंकले परिवर्तनाचे रणशिंग

## अध्यात्म आणि राष्ट्रभक्तीचा अखंड हरिनाम सप्ताहातून जागर!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

तरुण पिढी भरकटलेली आहे, हा समाजाचा समज पुसून टाकत बोरद (ता. तळोदा) येथील तरुणांनी अध्यात्म, शिस्त आणि सामाजिक प्रबोधनाचा एक नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. २६ ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहा'चे संपूर्ण सारथ्य गावातील तरुण रक्ताने ओढले, ज्यामुळे हा सोहळा केवळ धार्मिक उत्सव न ठरता सामाजिक परिवर्तनाची एक मोठी चळवळ ठरला आहे.

**मोबाईलच्या जाळ्यातून बाहेर पडून संस्कृतीचे रक्षण**

आजची तरुण पिढी मोबाईल गेम्स, व्यसने आणि पाश्चात्य संस्कृतीच्या अंधानुकरणात गुरफटलेली असताना, बोरदच्या विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळाच्या खांद्याला खांदा लावून तरुणांनी या सप्ताहाचे नेटके नियोजन केले. मंदिर परिसराची स्वच्छता, येणाऱ्या भाविकांची बैठक व्यवस्था, कीर्तनकारांचा पाहुणचार आणि महाप्रसादाचे वितरण या सर्व आघाड्यांवर तरुण सेवेकरी अहोरात्र राबत होते.

**कीर्तनातून 'राष्ट्र प्रथम' आणि ज्वलंत विषयांवर प्रबोधन**

या सप्ताहाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कीर्तनाचे विषय. परंपरेला आधुनिकतेची आणि राष्ट्रनिष्ठेची जोड देत कीर्तनकारांनी समाजातील गंभीर प्रश्नांवर प्रहार केला त्यामध्ये व्यसनामुळे उध्वस्त होणारी तरुण पिढी वाचवण्यासाठी 'व्यसनमुक्त समाज' हेच राष्ट्रउभारणीचे पहिले पाऊल असल्याचे ठामपणे मांडण्यात आले.लव्ह जिहाद, धर्मांतर यांसारख्या विषयांवर तरुणांनी जागृत राहण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. तुटत चाललेल्या संवादामुळे विस्कळीत होणारी कुटुंब व्यवस्था वाचवण्यासाठी पालकांनी मुलांवर संस्कार करण्याचे आवाहन करण्यात आले.वृक्षवल्ली आम्हा सोयरे... हा संदेश केवळ अभंगापुरता मर्यादित न ठेवता, वृक्षारोपण आणि जलसंधारणाची शपथ यावेळी देण्यात आली.सप्ताहाच्या सांगता दिवशी, कीर्तनात ह.भ.प. जनार्दन महाराज राजपूत आरवेकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन अनेक तरुण मुलांनी स्वखुशीने गळ्यात तुळशीमाळा धारण केल्या. फॅशनच्या युगात भक्तीचा हा मार्ग स्वीकारून या तरुणांनी संस्कारित तरुण हीच देशाची संपत्ती असल्याचे सिद्ध केले.

**प्रशासनासाठी आणि समाजासाठी आदर्श**

अत्यंत शिस्तबद्ध रीतीने पार पडलेल्या या सप्ताहाची चर्चा संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यात होत आहे. कोणत्याही वादाशिवाय, राजकारण विरहित आणि केवळ भक्ती व सेवा भावनेने केलेल्या या आयोजनाचे ग्रामस्थांनी तोंडभरून कौतुक केले. ३० जानेवारी रोजी महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता झाली.



# धडक! भरधाव ब्रिझाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू; उमरी-तळोदा रस्त्यावरील भीषण अपघात

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

उमरी ते तळोदा रस्त्यावर भरधाव वेगाने जाणाऱ्या एका ब्रिझा कारने पाठीमागून दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीस्वार सिताराम रामदास वैष्णव (वय ६४, रा. तळोदा) यांचा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी पावणेतीन वाजेच्या सुमारास चौगाव फाट्याजवळ घडली.मिळालेल्या माहितीनुसार, मयत सिताराम वैष्णव हे आपल्या होंडा शाईन मोटारसायकलने (क्र. एम एच –३९ ए ए –६३६८) उमरी गावाकडून तळोदाकडे येत होते. याच दरम्यान, मागून येणाऱ्या मारुती सुझुकी ब्रिझा कारच्या (क्र. जी जे –२६ ए बी –९०६३) चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व हयगयीने चालवून दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, वैष्णव यांच्या डोक्याला आणि खांद्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला.या अपघातात केवळ दुचाकीचेच नव्हे, तर ब्रिझा कारचेही मोठे नुकसान झाले आहे. कारमधील चालक प्रकाश तुकाराम मराठे आणि त्यांच्यासोबत असलेल्या त्यांच्या आई रुखमाबाई तुकाराम वाडणे (रा. नंदुरबार) हे दोघेही जखमी झाले आहेत.याप्रकरणी चेतन मुकूंददास बैरागी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तळोदा पोलीस ठाण्यात संशयित चालक प्रकाश मराठे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५ (अ), १२५ (ब), ३२४(४) आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक योगेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विजय जावरे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. या गुन्ह्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'ई-साक्ष' नोंदवण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे.



# बस स्थानक–सावरकर चौकातील पोलिसी चौकी कुलूप बंदच ; वाहतूक अनियंत्रित पोलीस प्रशासनाने लक्ष द्यावे जनतेची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील बस स्थानक –सावरकर चौक परिसरात असलेली पोलिसी चौकी ही केवळ नावापुरतीच उरल्याचे चित्र दिसून येत आहे. सदर चौकीवर बहुतांश वेळा कुलूप लावलेले असल्याने परिसरातील वाहतूक पूर्णपणे अनियंत्रित होत आहे. याचा थेट फटका प्रवासी, पादचारी तसेच स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे.या चौकातून दररोज शेकडो वाहने, एसटी बसेस,रिक्षा व खासगी वाहतूक मार्गक्रमण करते.मात्र पोलिसांची उपस्थिती नसल्याने वाहन चालकां कडून वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. चुकीच्या पद्धतीने पार्किंग, नो–पार्किंगमध्ये वाहने उभी करणे,रस्त्यावर अडथळा निर्माण होणे यामुळे वारंवार कोंडीची स्थिती निर्माण होत आहे. अपघाताचा धोका देखील वाढला असून नागरिकां मध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.चौकी आहे पण पोलिस नाहीत अशी चर्चा नागरिकांत होत असून, या पोलिसचौकीचा प्रत्यक्ष उपयोग काय असा सवाल उपस्थित केला जात आहे. विशेषतः सकाळ व संध्याकाळच्या वर्दळीच्या वेळेत तरी चौकी कार्यरत ठेवावी,वाहतूक पोलीस नेमावेत व नियमित नियंत्रण ठेवावे अशी ठाम मागणी जनतेतून होत आहे.प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन पोलिस चौकी नियमित पणे सुरू करावी,अन्यथा भविष्यात गंभीर अपघात घडल्यास जबाबदारी कोणाची? असा सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.



# प्रशासकीय दिरंगाईचा निषेध! तेलखेडीच्या शेतकऱ्यांचे ५ फेब्रुवारीला रस्ता रोको आंदोलन

## भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे वातावरण तापले; 'युवा क्रांती' संघटनेसह ग्रामस्थांचा आक्रमक पवित्रा

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी | प्रतिनिधी**

धडगाव तालुक्यातील तेलखेडी येथील शेतकऱ्यांना अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाच्या नुकसान भरपाईपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवल्याचा आरोप करत, प्रशासनाविरोधात आता एल्गार पुकारण्यात आला आहे. 'युवा क्रांती' संघटना आणि तेलखेडी ग्रामस्थांच्या वतीने येत्या ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रोहजरीपाडा येथे धडगाव–शहादा मुख्य रस्त्यावर बेमुदत रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात तहसीलदार अक्राणी यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे तेलखेडी परिसरातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले होते. प्रशासकीय स्तरावर पंचनामे होऊनही, नुकसान भरपाईच्या अधिकृत यादीत तेलखेडी गावाचा समावेश करण्यात आलेला नाही. यामागे उप कृषी अधिकारी विजय भलकारे यांची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. भलकारे यांनी कथित स्वरूपात आर्थिक मागणी केली होती आणि ती पूर्ण न झाल्यामुळेच गावाला यादीतून वगळले, असा ठाम दावा निवेदनात करण्यात आला आहे.



**प्रशासकीय दुर्लक्षामुळे संताप**

यापूर्वी ५ जानेवारी २०२६ रोजी युवा क्रांती संघटनेने प्रशासनाला निवेदन दिले होते. मात्र, महिना उलटूनही त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. वारंवार विनंती करूनही दखल घेतली जात नसल्याने, अखेर लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही, असे आंदोलकांनी म्हटले आहे. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला पूर्णपणे प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

**आंदोलकांच्या प्रमुख मागण्या**

पुनर्तपासणी: गावातील सर्व पीक पंचनाम्यांची तातडीने फेरचौकशी व्हावी.

समान भरपाई: इतर बाधित गावांप्रमाणेच तेलखेडीलाही तात्काळ नुकसान भरपाई मंजूर करावी.

दोषींवर कारवाई: त्रिस्तरीय समितीवर गुन्हे दाखल करून त्यांची निष्पक्ष चौकशी व्हावी.

भ्रष्टाचार चौकशी: उप कृषी अधिकारी विजय भलकारे यांच्यावर भ्रष्टाचार आणि कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी फौजदारी कारवाई व्हावी.

**ग्रामस्थांचा मोठा सहभाग**

या निवेदनावर प्रदेश कार्यकारणी सदस्य मंगेश वळवी, तालुका प्रमुख लक्ष्मण पाडवी, तालुका संघटक रविंद्र वळवी, संपर्क प्रमुख बावा पावरा, जनसंपर्क प्रमुख अमिताभ वळवी यांच्यासह पोलीस पाटील माका पावरा आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.५ फेब्रुवारीला होणाऱ्या या आंदोलनाकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, प्रशासन यावर काय भूमिका घेते हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# संत तुकाराम प्राथमिक विद्यालयाचे प्रांगण आनंद नगरीने बहरले–बबनराव आंधळे



दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित,संत तुकाराम प्राथमिक विद्यालय, तेलगाव रोड,बीड येथे विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान वाढण्यासाठी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी विविध उपक्रमाचा एक भाग म्हणून शाळेत आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले.यामध्ये खाद्यपदार्थाची खरेदी विक्री करणाऱ्या विद्यार्थी व पालकाच्या गर्दीने,संत तुकाराम प्राथमिक विद्यालयाचे प्रांगण बहरून गेले या आनंद नगरीचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक श्री. बबनराव आंधळे सर व सामाजिक कार्यकर्ते सादेक भाई यांच्या हस्ते करण्यात आले.प्रमुख अतिथी म्हणून युनूसभाई, एजाज भाई,सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री.अंकुश चव्हाण सर हे उपस्थित होते मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि आनंद मेळाव्यासाठी शुभेच्छा सुद्धा दिल्या आणि त्यांनी बनवलेल्या विविध पदार्थाचा यथोचित रित्या आस्वाद देखील घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनीबनवून आणलेले विविध पदार्थ आपापल्या स्टॉलवर मांडून त्याला नाव देऊन आकर्षकपणे सजवले होते.ग्राहकांना आपले पदार्थ विकत घेण्यास आग्रह केला आणि मेहनत करून खरी कमाई करण्याचा आनंद मिळवला इतरविद्यार्थ्यांनी आणि पालकांनी सुद्धा आपापल्या आवडीचे पदार्थ खरेदी करून त्यावर यथोचितरित्या ताव मारला यात झुणका भाकरी,तिखट पुरी,चिंचा, किराणा,भाजीपाला, इडली,डोसा,पाणीपुरी, चहा,दाबेली,दही धपाटे, भेळ,पॅटीस,आप्पे,रसना, मोसंबी,केळी या चटकदार पदार्थाचा आस्वाद घेण्यासाठी परिसरातील लोकांनी देखील गर्दी केली होती. अशा सुंदर आणि बहारदार कार्यक्रमाचे नियोजन करून यशस्वी करण्यात शाळेचे सर्व शिक्षक यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.


# सोरापाडा येथील श्री.कालिका मातेच्या यात्रोत्सवाला उत्साहात प्रारंभ

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी | प्रतिनिधी**

अक्कलकुवा शहरालगत असलेल्या सोरापाडा येथील नवसाला पावणारी अशी ख्याती असलेल्या श्री. महाकाली मातेच्या यात्रोत्सवाला माघ शुद्ध पौर्णिमेला दि. २ फेब्रुवारी पासुन मोठ्या जल्लोषात प्रारंभ होत आहे. या यात्रोत्सवाला ऐतिहासिक परंपरा लाभली असुन हा यात्रोत्सव शतकाच्या पार गेला आहे. दि. १९ फेब्रुवारी १८१९ रोजी माघ शुद्ध पौर्णिमेला महाकाली मातेची पहिली यात्रा भरविण्यात आली होती. यावर्षी दि. २ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी २०२६ हया कालावधी दरम्यान हा यात्रोत्सव राहणार आहे. ही यात्रा सातपुड्याच्या परिसरातील पहिली यात्रा असल्यामुळे परिसरातील ग्रामस्थ व यात्रेकरुंमध्ये चैतन्य व उत्साहाचे वातावरण आहे.दि. १ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी तालुक्यातील विविध गावातुन येणाऱ्या मानाच्या तगदरावांची सवाद्य मिरवणूक काढण्यात येईल त्यानंतर विधिवत पुजा करुन यात्रेला प्रारंभ होईल. यात्रेच्या प्रारंभी श्री. कालिका देवीच्या आरतीचा मान काठी संस्थानिकांच्या वारसदारांना देण्याची परंपरा आहे.

अक्कलकुवा तालुक्यातील काठी संस्थानिकचे राजे श्री. रणजितसिंग सुरजसिंग पाडवी यांना पुत्रप्राप्ती नव्हती त्यामुळे त्यांनी कुलस्वामिनी श्री. महाकाली मातेच्या नावाने पुत्रप्राप्तीसाठी नवस केलेला होता, देवीच्या नावाने केलेला नवस खरा ठरला व आशीर्वाद स्वरुपात पुत्र प्राप्त झाला. रणजितसिंग सुरजसिंग पाडवी यांनी मुलाचे नाव रघुवीरसिंग ठेवले व नवस पुर्ती म्हणुन सन १९२० मध्ये राजेंनी कुलस्वामिनी श्री. महाकाली मातेच्या मंदिराचे सोरापाडा येथे साध्या पद्धतीने बांधकाम करुन देवीची व सरस्वती देवी, श्री. महालक्ष्मी देवी यांच्या मुर्ती व भगवान महादेव यांच्या पिंडची विधिवत स्थापना केली. त्याकाळी काठी चिप्टन यांनी देवीची पुजा अर्चा व मंदिराच्या विकासासाठी १२ एकर २७ गुंठे जागा दान केली. १९८२ साली परिसरात आलेल्या जोरदार चक्री वादळात मंदिरा शेजारी असणारे भव्य वडाचे झाड कोसळले त्यात मंदिराचा गाभा वगळता संपुर्ण मंदिराचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले. त्यामुळे मंदिराच्या विकासासाठी १९८६ साली सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या कडुन मंदिराची विश्वस्त म्हणुन नोंद करुन घेण्यात आली व प्रथम विश्वस्त म्हणुन लखाभाऊ मराठे यांनी काम पाहिले.मंदिराच्या विश्वस्त नोंदणी नंतर जुन्या मंदिराचे संगमरवरी वास्तुत रुपांतर झाले. नव्या संगमरवरी वास्तूचा २००६ साली जीर्णोद्धार करुन नवीन वास्तूच्या समोर श्री. हनुमानाचे तर बाजुला श्री महादेवाच्या मंदिराची उभारणी करण्यात आली. २०२५ साली श्री. हनुमान मंदिराची प्राण प्रतिष्ठा तर शनी देवाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली.अक्कलकुवा परिसर हा कृषीप्रधान परिसर असल्याने या यात्रेला खुप महत्व आहे. या वर्षी या यात्रेत सातपुड्यातुन हजारोंच्या संख्येने गावठी, खिल्लारी, नागोरी जातीच्या हजारों बैलांची आवक झाली आहे. या बैल बाजारावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे नियंत्रण असते. बैल बाजारात बैलांच्या खरेदी विक्रीतुन कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते, तसेच शेतीच्या व्यवसायात दळण वळणाची मदत व्हावी व उत्पन्नात वाढ व्हावी याकरीता लाकडी व लोखंडी स्वरुपातील बैलगाड्या देखील या ठिकाणी मोठया प्रमाणावर विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. या यात्रेत मनोरंजनासाठी लहान मोठया पालख्या, मौत का कुवा, संसारोपयोगी साहित्य, भांड्यांची दुकाने, लहान मुलांच्या खेळणीची दुकाने, सौंदर्योपयोगी साहित्याची दुकाने, हॉटेल्स, रसवंती गृहे, फुगेवाले, संत्रा, केळी, रताळी आदी वस्तूंची दुकाने थाटली आहेत. या यात्रेत केवळ महाराष्ट्रातुनच नव्हे तर मध्य प्रदेश व गुजरात राज्यांतून भाविक व व्यावसायिक दाखल झाले आहेतसालाबादा प्रमाणे या वर्षी देखील माघ शुद्ध पौर्णिमे पासुन यात्रेला सुरुवात होणार आहे. ही यात्रा किमान ८ दिवसांपर्यंत भरत असते. शतकी परंपरा लाभलेल्या या मंदिराच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष म्हणुन अक्कलकुवा अक्राणी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमश्या पाडवी, मंडळाचे उपाध्यक्ष पृथ्वीसिंग पाडवी यांच्या सहविश्वस्त मंडळ कार्यरत असुन यात्रोत्सवाच्या यशस्वितेसाठी संपुर्ण विश्वस्त मंडळ परिश्रम घेत आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077